। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ७९ वा । शनिवार दिनांक ३० मे, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत रामण वय ३४ वर्षे, रा. बोरवंटी पारधी पिढी ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी १८.३० वा. सु.बोरवंटी शिवारातील पारधी पिढी येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक लोखंडी कत्ती हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला शिराढोण पोलींसाना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे- किरण पवार पोलीस अंमलदार नेमणुक पोलीस ठाणे शिराढोण यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह१३५ महा पोलीस अधिनियम अन्वये शिराढोण पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### घरासमोरील ट्रॅक्टरचे पंजी व रोटावेटरची केली चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सविता संजयराव जाधव, वय ५० वर्षे, रा. व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव ह.मु. बाळेखेड उत्तर सोलापूर यांचे व्हंताळ येथील शेत गट नं १७९ मधील घराचे व सेटरचे कडी कोंडा राजाभाउ , पृथ्वीराज दोघे रा. व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी तोडून नुकसान करुन घरासमोरील ट्रॅक्टरचे पंजी व रोटावेटर एकुण ४९,०००किंमतीचा माल चोरुन नेला. फिर्यादी व त्यांचे दिर शेतात गेले असता नमुद आरोपींनी शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सविता जाधव यांनी दि.२८.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३२४(४), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल.

धाराशिव (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखा अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दत्ता बाबा शिंदे, वय २६ वर्षे, रा. रामकुंड ता. भुम जि. धाराशिव यांनी दि. २७.०५.२०२६ रोजी येडशी ते धाराशिव जाणारे धाराशिव येथील वरुडा रोड ओव्हर ब्रिज येथे महिंद्रा कंपनीचा बोलेरा पिकअप क्र एमएच ३२५ एजे ०१९४ मध्ये पाच जर्शी गायी एकुण २,१५,००० वाहनसह १०,६५,००० किंमतीचे गोवंशीय जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ब) सह कलम ५(अ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## साहित्यिक बिळात जाऊन बसले; समाजाच्या दुर्दशेला साहित्यिकच जबाबदार - डॉ. शरद गोरे



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- सध्याच्या परिस्थितीवर साहित्यिक बोलत नाहीत. साहित्यिकांना सत्य मांडण्याची भीती वाटू लागली आहे. तुम्ही मेलेले आहात की जिवंत आहात, हा प्रश्न साहित्यिकांनी स्वतः ला विचारला पाहिजे. समाजाच्या आजच्या दुर्दशेला साहित्यिकही तितकेच जबाबदार आहेत, अशी खंत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक डॉ. शरद गोरे यांनी व्यक्त केली. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन गुरुवारी धाराशिव येथील 'लोकनेते अजितदादा पवार साहित्यनगरी'मध्ये उत्साहात झाले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या नावाने उभारलेल्या 'विचारपेठे'त आणि संतश्रेष्ठ गोरोबाकाका प्रवेशद्वारातून संमेलनस्थळी प्रवेश करत साहित्यप्रेमींनी मोठी उपस्थिती लावली.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. नंदकुमार राऊत, स्वागताध्यक्ष आमदार कैलास घाडगे पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, कर्नाटक राज्याध्यक्ष रवींद्र पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगी काळभोर, राष्ट्रीय विश्वस्त गुरू भांगे, अनिल अनुभुळे, राष्ट्रीय खजिनदार फुलचंद नागटिळक, मुख्य संयोजक ज्ञानेश्वर पतंगे, परमेश्वर पालकर, तुकाराम गंगावणे, जिल्हाध्यक्ष प्रा. राजा जगताप, महिला जिल्हाध्यक्ष मीना महामुनी आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. गोरे म्हणाले, एक काळ असा होता की साहित्यिक वाघासारखे गर्जत होते; आज साहित्यिक बिळात जाऊन बसले आहेत. शेतकरी आत्महत्या करतोय, सामान्य माणूस संकटात आहे; मात्र साहित्यिक त्यावर भाष्य करताना दिसत नाहीत. बहुतांश साहित्यिक भौतिकवादात अडकले असून वास्तवापासून दूर गेले आहेत. साहित्यिकांनी तुकोबाराय आणि महात्मा फुले यांच्या सत्यविचारांच्या मार्गाने समाजाच्या प्रश्नांवर निर्भीडपणे बोलले पाहिजे.

साहित्यिकांना मिळणारी पाच हजार रुपयांची मासिक पेन्शन किमान ३० हजार रुपये करण्यात यावी, तसेच साहित्यिकांसाठी स्वतंत्र 'साहित्य सहजीवन' वसाहत उभारून त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

**कैलास पाटील यांचे तोंडभरून कौतुक**

आमदार कैलास घाडगे पाटील हे आजच्या राजकारणातील राजहंस असून इतर राज्यकर्त्यांनी त्यांचे अनुकरण करण्याची गरज आहे, असे गौरवोद्गार डॉ. गोरे यांनी काढले. साहित्यावर प्रेम करणारे आणि सुसंस्कृत राजकारण करणारे लोकप्रतिनिधी प्रत्येक तालुक्यात असतील तर महाराष्ट्र बदलायला वेळ लागणार नाही, असेही ते म्हणाले.

भास्कर चंदनशिव यांना मरणोत्तर जीवनगौरव

ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव यांना मरणोत्तर 'साहित्य जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी कमलताई चंदनशिव यांनी पुरस्कार स्वीकारला. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते.

परिवहन विभागात मराठी सक्तीचा निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा विशेष सन्मानही यावेळी करण्यात आला.

विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

किशोर टिळेकर यांना 'संत तुकाराम महाराज साहित्यरत्न', साक्षी जमादार यांना 'सावित्रीबाई फुले युवा साहित्यरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल दत्तात्री भोंगळे, विनोद राऊत आणि गणेश मोरे यांना 'तानुबाई बिर्जे राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्यासाठी शहाजी पाटील आणि अनुजा प्रसाद मोहिते यांचाही गौरव करण्यात आला.

**ग्रंथ प्रकाशन सोहळा**

या संमेलनात 'महाराष्ट्राचे शिल्पकार लोकनेते अजितदादा पवार' या काव्यगौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. शरद गोरे यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. याशिवाय तुकाराम गंगावणे लिखित 'मराठवाडा मुक्तीचे झुंजार सेनानी', किशोर टिळेकर यांचे 'राजकारण व पुढारी', सूर्यकांत मामुगडे यांचे 'कबीर वाणी' आणि प्रा. नंदकुमार बालूरे लिखित 'विश्वकवी उमेश शेकडे' या ग्रंथांचेही प्रकाशन झाले. उद्घाटन सोहळ्यास साहित्यिक, कवी, लेखक आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## धाराशिव येथे इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचे तीव्र आंदोलन ; सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

धाराशिव (प्रतिनिधी) : पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांविरोधात काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी देशपांडे स्टॅण्ड येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. इंधन दरवाढ रद्द करा, महागाई करणारे सरकार हाय हाय, सामान्य जनतेची लूट बंद करा, शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मागील ११ दिवसांत पेट्रोल व डिझेलच्या किमतीत तब्बल ८ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली असून ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. गेल्या १२ वर्षांत पेट्रोलच्या किमतीत सुमारे ३८ टक्के तर डिझेलच्या किमतीत तब्बल ६२ टक्के वाढ झाल्याने नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. शेतकरी, महिला, छोटे व्यावसायिक तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या काळात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले होते. तरीदेखील पेट्रोल-डिझेलच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यात आल्या होत्या. मात्र सध्या कच्च्या तेलाचे दर कमी असतानाही देशात पेट्रोलचे दर १०० रुपयांच्या घरात पोहोचल्याची टीका निवेदनात करण्यात आली आहे. ही बाब केंद्र सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांची साक्ष असल्याचा आरोप काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील कर व उत्पादन शुल्काच्या माध्यमातून तब्बल ४३ लाख कोटी रुपयांचा महसूल गोळा केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच अलीकडील दरवाढीनंतर तेल कंपन्यांनी काही तासांतच हजारो कोटी रुपयांची कमाई केल्याचा आरोपही करण्यात आला. ही नफेखोरी म्हणजे सर्वसामान्यांच्या खिशावर टाकलेला आर्थिक दरोडा असल्याची तीव्र प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या किंमतींचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होत असून वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, भाजीपाला तसेच इतर आवश्यक वस्तूंच्या किंमतीत सातत्याने वाढ होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. उत्पन्न स्थिर असताना महागाई वाढत असल्याने सामान्य नागरिकांचे जगणे कठीण बनल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

डिझेल तुटवड्यामुळे राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर पुरवठा विस्कळीत झाला असून शेतीची कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली आहेत. ट्रॅक्टर, पंप आणि शेती मशागतीसाठी डिझेल अत्यावश्यक असल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसची दरवाढ तात्काळ मागे घ्यावी तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरवठा कोणत्याही अडथळ्याविना सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

आंदोलनात जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर,खलील सय्यद, प्रशांत पाटील, शहाजी मुंडे, उस्मान कुरेशी, संग्राम मुंडे, अशोक बनसोडे, गोरोबा झेंडे, मिलिंद गोवर्धन, शौकत मौलाना, वसंत मडके,

दादासाहेब गायकवाड, संजय सरवदे, शिवाजी गायकवाड, अभिषेक बागल, धनंजय राऊत, सचिन गुरव, अंकुश पेठे, चंद्रकांत जाधव, आयुबखाँ पठाण, अचितराव घोगरे, ड. मुशरफ, अर्जुन बिराजदार, नाना भोसले, मधुकर यादव, विजय वाघमारे, अमित रेड्डी, मधुकर बिद्री, संग्राम पाटील, अप्पासाहेब शेळके, रोहन निरफळ, विलास शाळू, मोईज शेख, समी काझी, भीमा देशमुख, सचिन देशमुख, बाळासाहेब गपाट, दिलीप क्षीरसागर, अमर तागडे व अजय खरसडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अवैध जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (शेख अंजुम)-पोलीस अधीक्षक, धाराशीव श्रीमती रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अमोल मोहिते (परि. पोलीस उपअधीक्षक) यांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, धाराशिव शहर लगत तुळजापूर-बीड महामार्ग बायपास येथे अवैधरित्या चालविण्यात येत असलेल्या तीन पत्ती (तिरट) क्लबवर आज दिनांक २८/०५/२०२६ रोजी छापेमारीची धडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये परि.पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांच्यासह सहायक पोलीस निरीक्षक श्री. विजय आटोळे, QRT अंमलदार व चालकांनी सहभाग घेतला.

सदर कारवाईदरम्यान घटनास्थळावरून एकूण ११ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ चे कलम ४ आणि ५ नुसार गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. आरोपींकडून जुगाराच्या साहित्यासह रु. ३७७७०/- रोकड आणि १ चारचाकी,१० दुचाकी, इतर मुद्देमाल, असा एकूण रु./-३९०७७०(अक्षरी रुपये तीन लाख नव्वद हजार सातशे सत्तर फक्त) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईच्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रीतु खोखर यांनी अवैध व्यवसाय करणाऱ्यांना कठोर इशारा दिला असून, धाराशीव जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध यापुढेही अशीच कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

## महाडीबीटीवरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी ३१ मेपर्यंतची मुदत

धाराशिव ` (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीद्वारे दिला जातो.राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.० कार्यान्वित करण्यात येणार असल्याने शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील प्रलंबित अर्ज ३१ मेपूर्वी पूर्णतः निकाली काढण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण ४०२ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याची माहिती समाज कल्याण विभागाने दिली आहे.

महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आदी योजनांचा लाभ दिला जातो.समाज कल्याण विभागाकडून जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना वेळोवेळी पत्र,वृत्तपत्र जाहिराती तसेच व्हॉट्सप समूहांच्या माध्यमातून सूचना देण्यात आल्या होत्या.मात्र,अद्यापही अनेक अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.

प्रलंबित अर्ज वेळेत निकाली न काढल्यास नवीन प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे या कामाला सर्वोच्च प्राथमिकता देऊन विहित मुदतीत सर्व अर्ज निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान,विहित मुदतीत अर्ज निकाली न काढल्याने अनुसूचित जाती प्रवर्गातील एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संबंधित विद्यार्थ्यावर राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.३१ मेपर्यंत सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

## पीक कापणी प्रयोगावरच विमा भरपाई द्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश



'तांत्रिक उत्पादन' प्रणाली प्रत्यक्ष परिस्थितीच्या विसंगत परिणाम देत असल्याचे सिद्ध झाले आहे. सदर प्रणाली नवीन असल्याने त्यातील काही त्रुटी आणि मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत. या गंभीर विसंगतीबाबत आग्रही पाठपुरावा करून आपण जिल्हा प्रशासनाला कृषी विद्यापीठाकडून वैज्ञानिक अहवाल मागविण्यास भाग पाडले. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी 'तांत्रिक उत्पादन' अहवालात करण्यात आलेले दावे फेटाळून लावत हे मॉडेल विसंगत असल्याचा स्पष्ट अहवाल दिला आहे. त्यानुसार धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मंडळनिहाय उत्पादकता ग्राह्य धरूनच शेतकऱ्यांना विमा भरपाई द्यावी अशी शिफारस राज्य सरकारकडे केली आहे. आपण केलेल्या आग्रही पाठपुराव्याला यश आले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

खरीप हंगाम २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यामध्ये एकूण ५,७२,२०३ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी झाली होती, ज्यापैकी तब्बल ८० टक्के क्षेत्रावर म्हणजेच सुमारे ३.९६ लक्ष हेक्टरवर केवळ सोयाबीनची पेरणी करण्यात आली होती. जिल्ह्यातील ४,९६,०९१ शेतकऱ्यांनी आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड इन्शुरन्स कंपनीकडे आपली पिके विमा संरक्षित केली होती. मात्र, मे २०२५ मध्ये मागील २६ वर्षांतील सर्वाधिक २७९.६ मि.मी. पाऊस झाला. त्यानंतर जून ते ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यात तब्बल २२० वेळा अतिवृष्टीची नोंद झाली. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातच १४१ वेळा अतिवृष्टी झाल्याने सरासरीच्या १५९ टक्के पाऊस कोसळला. यामुळे सोयाबीनचे पीक फुलोऱ्यात आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना शेतात पाणी साचले, बुरशीजन्य रोग पसरले आणि उभे पीक कुजून गेले. शासकीय पंचनाम्यानुसार ९२ टक्के (५.७७ लक्ष हेक्टर) क्षेत्र बाधित झाले होते. नुकसानीची तीव्रता पाहता जिल्ह्यात ५०४ पीक कापणी प्रयोग नियोजित होते. मात्र, विमा कंपनीने यातील ३६८ प्रयोगांवर जाणीवपूर्वक आक्षेप घेतले. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठकीत ५० टक्के पीक कापणी प्रयोग आणि ५० टक्के तांत्रिक उत्पादन (ऊ्‌डड-ढ मॉडेल) यांच्या सरासरीवर आधारित अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात प्रत्यक्ष शेतात ३ ते ४ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन आलेले असताना, तांत्रिक मॉडेलचा वापर करून महसूल मंडळांमध्ये १० ते १२ क्विंटल उत्पादन दाखवण्यात आले आणि जिल्ह्यातील एकूण नुकसान केवळ १० टक्केच असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. या अन्यायकारक निष्कर्षावर आपण तीव्र आक्षेप घेतला. केवळ आक्षेप घेऊन न थांबता तांत्रिक उत्पादनाचे निकष कोणत्या आधारे ठरवले गेले, याची तज्ञांमार्फत सखोल पडताळणी (खपवशशिपवशपीं एुर्शिीं -ीर्शीीाशपीं) करण्याची मागणी आपण कृषिमंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांना प्रत्यक्ष भेटून,तर कृषी आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली होती. कृषी मंत्र्यांनी कृषी सचिवांना तातडीने याबाबत कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. आपण केलेल्या मागणीवरून जिल्हा प्रशासनाने परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंना वैज्ञानिक अहवाल सादर करण्याची विनंती केल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## उपोषण-आंदोलनास धार असावी

उपोषण-आंदोलन म्हटले की, महात्मा गांधीजींची आठवण येते. महात्माजींच्या आंदोलनास ब्रिटीश घाबरत होते. एखाद्या राष्ट्रप्रेमींना अटक करायची म्हटले तर हात थरथरत होते. नुसते महात्माजींनी उपोषण करतो म्हटले की, ब्रिटीशांना घाम सुटत होता. एवढी ताकद होती. शेकडोच काय हजारोंच्या संख्येने जनसमुदाय पाठीशी होता. अन्नत्याग उपोषण, आंदोलन, मोर्चे म्हटले की, सत्ताधारी घाबरत होते. आता सतत मोर्चे, आंदोलने होतात. या आंदोलन-मोर्चात सहभाग जनसामान्यांचा किती आहे या बाबत विचार केला तर समजुन येते. मुळात देश स्वतंत्र्य झाला. लोकशाही स्विकारली, त्याच वेळी समस्या संपल्या आहेत. आपणच आपले लोकप्रतिनिधी निवडतो, या वेळी आपल्यासाठीच निवडतो. आपल्याच समस्या सोडविण्यासाठी निवडतो. असे असताना आंदोलन-मोर्चे कशासाठी? लोकशाहीत हा अधिकार दिला आहे. याला यश किती येते याचा देखिल विचार केला पाहिजे. आता घटना घडल्यावर दाद मागण्यासाठी आंदोलने होतात. एक घटना घडल्यावर पहिल्या घटनेचे आंदोलन-मोर्चेकरी विसरूनहीजातात. मोर्चेकरी किंवा आंदोलनकरी तेवढ्यापुरते आंदोलन करीत आहेत का? असे वाटायाला लागले आहे. प्रत्यक्षात वेगळे चित्र व पडद्याआड वेगळे चित्र पाहावयास मिळते हे दुर्दैव आहे. सध्याला जनसामान्यांचा पाठींबा किती मिळतो आहे. जनतेच्या अंगी नवचैतन्य दिसून येत नाही. भावनाशुन्य व्यक्ती बनत आहेत. आपल्याला काय करायाचे? ही भावना वाढीस लागत आहे. शेजाऱ्याचे घर जळाले माझे नाही ना! शेजाऱ्यावर गुंड अन्याय करीत आहेत माझ्यावर कोठे? ही भावना वाढीस लागत आहे ही वस्तूस्थिती आहे. याचा परिणाम नकारात्मक भावना निर्माण होत आहे. चैतन्यविरहीत भावना वाढीस लागत आहे. हे लोकशाहीत योग्य नाही. आलिकडे शैक्षणिक प्रकरणी गैर प्रकार केला, काही लोकांनी आर्थिक घोटाळा केला, औद्योगाची जागा इतरांना कशी दिली ? अशा विविध प्रश्नी आंदोलने-मोर्चे दिसून येतात ते तेवढ्यापुरते! याला लाखोंचा पाठींबा दिसून येतो का? किती आंदोलन-मोर्चेकरींचा सहभाग दिसून येतो, याचा विचार केला जात नाही. पाच पंचवीस किंवा शंभराच्या आत आंदोलनकरी दिसून येत असतील तर त्याला आंदोलन-मोर्चा म्हणावयाचे का? हा विचार करण्यासारखी बाब आहे. एका विद्यालयात एका मागासवर्गीय मुलींनी जीवन संपविले, पुढे काय झाले. आंदोलनकर्ते आपआपल्या कामाला लागले, प्रश्न प्रलंबित! असे लोकशाहीत होता कामा नये. लोकशाही व स्वराज्य आपणास बहाल केले. स्वराज्याचे सुराज्य करण्याची जबाबदारी देशात राहाणाऱ्याची आहे. हक्क लोकशाहीत बहाल केलेले आहेत. असे असताना आपणच म्हणायाचे खतरे में आहे. हे योग्य नाही. स्वातंत्र्यपुर्व काळात मोर्चे-आंदोलन हे हत्यार होते. त्याला धार होती आता ती बोथड झालेली आहे. याबाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. महिला व मुलीवर अन्याय, अत्याचार होत आहेत. बलात्कार होतात याचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. अगदी कोवळया बालकेवर अत्याचार नराधाम करीत आहेत व या बाबत न्यायप्रतिक्षेत दिवस काढावे लागत आहेत हे लोकशाहीत योग्य आहे का? त्यामुळे पुर्वीचे काळ व दिवस चांगले म्हणण्याची वेळ आली आहे. पुर्वी एखादी तक्रार केली तर न्याय निश्चित मिळत होता आता प्रतिक्षेत राहावे लागते ही वस्तूस्थिती आहे ती योग्य नाही. पहिल्यांदा एक लक्षात घ्यावे की, भारताला स्वराज्य अहिंसेने मिळाले नाही. शेकडो तरणेबांड युवक फासावर गेले. रक्ताच्या नद्या वाहिल्या आहे. आया-बहिणीची अब्रु लुटली. कुंकू पुसले गेले असे असताना आझादी अहिंसेने मिळाली हे सांगणे योग्य नाही. त्यामुळे आपणच आपल्या हक्कासाठी हक्क दिला असताना लढतो आहे हे किती योग्य आहे याचा विचार जनतेनी केला पाहिजे. मोर्चेकरी किंवा आंदोलनकरी हे ठराविक दिसून येतात. यात जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात असणे आवश्य असते ते दिसून येत नाही. त्यामुळे जी तळमळीची धार कमी दिसून येत आहे. जशी स्वातंत्र्याच्या काळी व पुर्वी एकी होती ती आता राहीली नाही. ठराविक समाजात अजूनही एकी दिसून येते. वास्तविक एकी हेच बळ आहे हे लक्षात घेवून चालले पाहिजे. ॲडजेस्टपना काही कामाचा नाही. नेतेगिरीची तशी पाहिली तर कमी नाही. एक नेता पेट्रोलपंपावर आला टाकी फुल्ल केली किक मारून गेला. त्याला विचारले पैसे घेतले नाही तो नेता आहे असे म्हणतो. ठराविक समाजाचे काम करतो. असे जर होत असेल तर न्याय कोणाकडे मागावा. मोर्चे आंदोलन कोणासाठी करावेत? मोर्चे-आंदोलनामुळे खरेच न्याय मिळतो का? हे प्रश्नच विचार करायाला लावणारे आहेत. जनतेत निराशाची भावना निर्माण होता कामा नये. नवचैतन्य निर्माण करणारे वातावरण असले पाहिजे. पुर्वी पेक्षा शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. घर तेथे शिक्षित व्यक्ती आहे. शिक्षणात प्रगती केली असताना आपण आपले हक्क विसरत चाललो आहोत. आपण आपली घटनाच विसरणे योग्य नाही. आपला हक्क तर कोणी हिसकावुन घेतले जात नाही ना याची खबरदारी घेतली पाहिजे. जनतेच्या न्याय-हक्काची बोथड झालेली लोकशाही वृद्धींगत करणे काळाची गरज आहे. आपण स्वतंत्र झालोत, स्वराज्यात मोर्चे-आंदोलने असावित का? हा विचार करणारा विषय आहे. काही वेळा स्वस्वार्थासाठी आंदोलने होतात तर काही वेळा जनतेसाठी मोर्चे व आंदोलने होतात. या बाबत कोणाला पाठींबा द्यावयाचा आहे याचा विचार आता जनतेनी केला पाहिजे. उठसुट या बाबत ठराविकांचा उद्योग जनतेनी ओळखला आहे. न्याय तर मिळतोच असे नाही. देखावा मात्र दिसून येत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आज स्वतंत्र भारतात, लोकशाहीत, घटनेनुसार चालतो व वागतो आहे. याची आठवण सतत ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे जनतेनी किती प्रमाणात सहभाग नोंदवयाचा का नाही याबाबत चिंतन होणे, विचार करणे आवश्यक आहे.

# "जनसंपर्कातून जनविश्वास जपणारा नेता"

# जनतेसाठी दरबार भरवणारा आमदार रमेशअप्पा कराड

**लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ऐतिहासिक नवा इतिहास घडविला मा. रमेशअप्पा कराड साहेब यांना विधानसभेत पाठवून जनतेनी जनहितासाठी नेता निवडला. आमदार झाल्याने त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही आजच्या बदलत्या काळात एकमेकांचा संवाद कमी होत असताना रमेशअप्पा मात्र सर्वसामान्यांच्या थेट संपर्कात आहेत. संवाद कार्यालयात दिवसभर भेटण्याकरिता उपलब्ध असतात. त्यांना भेटण्यासाठी कोणाच्या मध्यस्थीची गरज नाही हे विशेष. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब याच भावनेतून त्यांनी आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्व सामान्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला. जनता दरबारातून जनतेचे प्रश्न मार्गी लावले. गावा गावात, वाडीवस्तीत विकास कामासाठी कोट्यावधीचा निधी मिळवून देऊन गाव खेड्यात विकास काय असतो हे दाखवून दिले दिले. सामान्य कार्यकर्त्यांना मानसन्मान मिळवून देणारे संघर्षशील नेतृत्व मा. आ. रमेशअप्पा कराड साहेब यांचा आज जन्मदिवस. यानिमित्ताने त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा !!!.... चंद्रकांत कातळे, रेणापूर.**



काबाड कष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूरांच्या घामाचे मोल झाले पाहिजे; सर्व सामान्यांना, गोरगरीबांना त्यांचा न्यायहक्क मिळाला पाहिजे यासाठी सतत संघर्ष करणारे आणि लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून कार्यरत असणारे भाजपाचे नेते मा. रमेशअप्पा कराड साहेब हे जनसामान्यांच्या मनातील संघर्षशील आणि विश्वासपात्र नेते आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ग्रामीण मतदारसंघातून रमेशआप्पांना बहुमताने विजयी करून एक नवा इतिहास घडविला. खऱ्या अर्थाने हा विजय आप्पांचा नव्हे तर सर्वसामान्य अठरापगड गोरगरीब जनतेचा असं म्हटलं तर वावगं ठरणारे नाही.

**जनतेनी निवडलेला नेता**

लातूर तालुका हा काँग्रेसचा बालेकिल्ला या भागात भाजपाचे काम करणे तसे अवघडच होते, मात्र जिद्दीने जोमाने जिवाभाचे कार्यकर्ते निर्माण करुन त्यांच्या सुख दुःखात सहभागी होऊन प्रस्थापित शक्ति विरुद्ध सतत संघर्ष करत रमेशअप्पा कराड यांनी कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करुन भाजपाचे आणि स्वतःचे अस्तित्व उभे केले. आ. रमेशअप्पा यांची जिद्द, आत्मविश्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी अनेकवेळा अनुभवायला मिळाली. मागील दोन विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले मात्र कधीच खचले नाही. खचले ते आप्पा कसले पराभव झाल्याच्या दुसऱ्या दिवशीपासून पुन्हा त्याच उमेदीने गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी कार्यरत राहीले. याचा परिणाम गेल्या विधानसभा निवडणुकीत दिसून आला. जनतेनीच ही निवडणूक हातात घेतली आणि धनशक्ती, एकाधिकारशाही, हुकूमशाही विरुद्ध आवाज उठवून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवा इतिहास घडविला आणि रमेशआप्पांना विधानसभेत पाठविले. हक्काचा आमदार निवडून आणला. खऱ्या अर्थाने जनतेने जनहितासाठी नेता निवडला असे बोलले तर वावगे ठरणारे नाही.

**जनतेच्या कायम संपर्कात**

एखादा माणूस कुठल्याही पदावर निवडून गेला तर त्याच वागणं, त्याच राहणं, सामान्यांना कमी भेटणं, भेटायचं असेल तर वेळ घ्यावा लागतो असा खूप मोठा बदल झालेला आपणास पहावयास मिळतो. मात्र याला अपवाद ठरले ते रमेशअप्पा कराड. सर्वसामान्याच्या हितासाठी, अडचणीत सापडलेल्या, पिचलेल्या माणसाचे प्रश्न सुटले पाहिजेत, त्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसता आले पाहिजे याच भावनेतून पदावर असो अथवा नसो रमेशआप्पांचे कार्य गेली वर्षानुवर्ष सुरू आहे. आमदार झाल्यानंतर त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही उलट ज्या माणसांनी माझ्यावर विश्वास ठेवला मला मतदान रुपी आशीर्वाद दिले त्यांचे प्रश्न सोडवता यावेत त्यांच्या अडचणीत मदत करता यावी केवळ यासाठीच संवाद संपर्क कार्यालय सुरू केले.

बदलत्या काळात संवाद कमी होत असताना या संवाद कार्यालयाच्या माध्यमातून नियमितपणे सकाळी आकरा पासून रात्री किमान आठ पर्यंत येणाऱ्या प्रत्येकाशी संवाद साधण्याचा रमेशअप्पा प्रयत्न करतात. एवढेच काय तर कधीही रात्री अपरात्री सधा फोन करून कुणीही आप्पाशी संवाद साधू शकतो, बोलू शकतो. आप्पांना भेटण्यासाठी कुण्या मध्यस्थीची गरज नाही. थेट सहज भेट होते. संवाद कार्यालयात आलेल्या प्रत्येकाना विचारपूस केली जाते चहा-पाणी दिले जाते, अडचणी समजून घेऊन लगेच रमेशअप्पा संबंधितांना फोन करून प्रश्नाची सोडवणूक करतात. येणारा प्रत्येकजण रिकाम्या हाताने परत जात नाही. ग्रामीण भागातून आलेल्या सामान्यांना भेटीची अपेक्षा असते चार शब्द बोलण्याची इच्छा असते हे सर्व सहज घडून येत असल्याने सर्वसामान्य माणसात आप्पाबद्दलची आस्था आपुलकी आणि जिव्हाळा अधिकच दृढ होत आहे.

**चंद्रकांत सुर्यकांत कातळे**
**भारतीय जनता पार्टी, रेणापूर.**

**निधी व विकास कामाचे नियोजन**

आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य व नगरसेवक यांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीच्या बाबतीत आजपर्यंत अनेकांना वेगवेगळे अनुभव आले आहेत बरेच जण टक्केवारी शिवाय निधीच देत नाहीत काही लोकप्रतिनिधी तर छुपी गुत्तेदारी करतात मात्र याला रमेशअप्पानी छेद देत आमदार निधी वाटप असो की शासनाकडून एखाद्या योजनेमार्फत मिळालेल्या विकास निधी असेल याबाबतीत गावनिहाय नियोजन करून त्या गावात कुठल्या कामाची गरज आहे त्यानुसार गावातील कार्यकर्त्यांनी एकत्र बसून काम कोण करणार हे निश्चित झाल्यास त्या व्यक्तीला निधी दिला जातो त्यानुसार त्या गावात विकासाचे काम होते. यामुळे कामाचा दर्जा, गुणवत्ता दिसून येते. रमेशआप्पांच्या या नियोजनामुळे मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत आमदार निधी अथवा शासनाची कोणती ना कोणती योजना राबविण्यात आली आहे. आजपर्यंतच्या कुठल्याही विकास कामात कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे केवळ याच भावनेतून निष्कलंकपणे विकास कामा कडे लक्ष घालून कार्य केले आहे.

**जनता दरबार भरवणारा नेता**

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्यात त्यांच्याशी संवाद साधता यावा, ज्यांनी आपल्याला आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी याकरिता आ. रमेशअप्पा कराड साहेब यांनी जनता दरबार ही संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबवली. मतदार संघातील ममदापूर, मुरुड, रेणापूर, भादा व इतर ठिकाणी घेण्यात आलेल्या जनता दरबारास प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्हा, तालुका स्तरावरील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि सर्व सामान्य जनता आमने-सामने आल्याने अनेक प्रश्न चर्चा झाली निकाली निघाले. अतिक्रमित शेतरस्ते, वीज प्रश्न, अवैध दारू, रस्त्याचे प्रश्न, पीक विमा, अनुदान, निराधारच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, प्रवासी बस थांबे, घरकुल, स्मशानभूमी, कबाले यासह विविध वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा नागरिकांनी या दरबारात पाढा वाचला, गऱ्हाणे मांडले. संबंधित अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर न करता सामान्यांचे प्रश्न सोडवा अशी सूचना करून आडवणूक केली तर माफ करणार नाही असा दम ही त्यांनी दिला. एकूणच सामान्यांच्या प्रश्नासाठी आग्रही राहून दिलासा देण्याचे काम आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे. जनतेसाठी जनता दरबार भरवणारा नेता हीच भावना सामान्य जनतेतून दिसून आली.

मागील काळात झालेल्या विविध निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश आणि सामान्य कार्यकर्त्यांना सन्मानाची पदे मिळवून दिली. केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीतील विविध गावच्या विकासासाठी कोट्यावधी रूपयाचा निधी मंजूर करून आणला. अनेक कामांना मंजूरी मिळवून घेतली. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत, तर काही कामे प्रगतीपथावर आहेत हे खुप दिलासादायक आहे. मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीत आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून विविध मंदिरासमोर बांधण्यात आलेले सभागृह गावकऱ्यांना लक्षवेधी ठरत आहेत. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून काम करत असताना रमेशअप्पांनी जनहिताच्या विकास योजना मंजूर करताना गावागावात, वाडीवस्तीत कसल्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. वैयक्तिक लाभाच्या योजना संपूर्ण मतदार संघात मोठ्या प्रमाणात गरजु लाभार्थ्यांना मिळवूण दिल्या मदत केली. या सर्व योजना राबवत असताना जात, धर्म, पंथ, गटतट असा भेदभाव केला नाही यातून वसुधैव कुटुंबकम् याचा प्रत्यय दिसून आला.

आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह राजकारणात सतत अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे, गोरगरीब सर्व सामान्यांच्या हितासाठी संघर्ष करणारे, राजकारण आणि त्यातून मिळालेली पदे स्वताःसाठी नव्हे तर समाजाला उभे करण्यासाठी, अडचणीत, संकटात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी आहेत. याची जाण आणि भान ठेवून भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी समाजसेवेचे ओझे अखंडपणे वाहून नेत आहेत. त्यांचा आज ३० मे रोजी जन्मदिवस या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा. आप्पासाहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो त्यांच्या हातून जनसेवेचे कार्य कायम पणे अखंड घडत राहो हीच आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या चरणी प्रार्थना......!!!

# संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व: जनतेच्या न्यायासाठी झटणारे संवेदनशील आमदार रमेशअप्पा कराड

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रमेशअप्पा कराड यांचा वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नसून, संघर्ष, संवेदनशीलता आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचा प्रवास स्मरण करण्याचा क्षण आहे. राजकारणात प्रस्थापितांविरोधात रस्त्यावर उतरून लढणारे आणि गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने झटणारे नेतृत्व म्हणून रमेशआप्पांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात स्थान मिळवणारे आप्पा हे मितभाषी, शांत आणि सकारात्मक विचारांचे लोकनेते आहेत. रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीचं नातं श्रेष्ठ हे त्यांनी आपल्या वागणुकीतून दाखवून दिले. त्यामुळे लातूर-रेणापूर ग्रामीण भागातील अठरापगड जातीधर्मातील लोक त्यांच्यावर मनापासून प्रेम करतात.

रामेश्वर हे मूळ गाव असले तरी लातूर शहरात स्थायिक झाल्यानंतर समाजकारण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम त्यांच्या जीवनात दिसून आला. वारकरी संस्कार लाभलेल्या कराड कुटुंबातून आलेल्या आप्पांवर कै. प्रयाग आक्का आणि विश्वशांतीचे प्रणेते डॉ. विश्वनाथ कराड यांचे संस्कार झाले. एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीतही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले.

राजकारणात सहज यश मिळत नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागतो. लातूर जिल्ह्यातील प्रस्थापित राजकारणाविरोधात रमेशआप्पांनी सातत्याने आवाज उठवला. सुरुवातीला शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम केल्यानंतर स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ते भाजपात सक्रिय झाले आणि मागील २५ वर्षांपासून संघटनात्मक कामात स्वतःला झोकून दिले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न, सामान्य जनतेवरील अन्याय, बंद दरवाज्यांआड चालणारी सत्तेची दादागिरी याविरोधात त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी जनतेच्या मनात स्थान निर्माण केले होते. विधान परिषद सदस्य असताना देखील त्यांनी रस्ते, मूलभूत सुविधा आणि विकासकामांसाठी मोठा निधी आणून मतदारसंघात कामांची गती वाढवली.

रमेशआप्पांची आणखी एक मोठी ओळख म्हणजे त्यांची सामाजिक आणि धार्मिक बांधिलकी. गावागावांत सामाजिक सभागृह, मंदिर परिसर विकास, भजनी मंडळांना टाळ-मृदंग-वीणा वाटप, गणेशोत्सवासाठी गणपती वाटप, वृक्षलागवड अभियान अशा अनेक उपक्रमांतून त्यांनी संस्कारक्षम समाज उभा करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायाबद्दल असलेली त्यांची आस्था आजही तितकीच दृढ आहे.

एमआयटी रुग्णालयाच्या माध्यमातून गोरगरिबांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे यांसारख्या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळाला. परोपकार हाच धर्म ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते.

राजकारणात अनेकदा स्वार्थ, दिखावा आणि वैयक्तिक वैर पाहायला मिळते. पण रमेशआप्पांच्या स्वभावात द्वेष नाही, सूडभावना नाही. माझी जनता, माझी माणसं ही भावना जपत त्यांनी माणुसकीचं नातं जोपासलं. त्यांचा २४ तास सुरू असलेला जनसंपर्क दरबार सामान्य माणसासाठी आशेचा किरण ठरतो.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करणे हे त्यांनी कायम प्राधान्याने जपले. पंकजाताई मुंडे यांच्या कुटुंबीयांशी असलेला त्यांचा जिव्हाळा आणि संघटनात्मक निष्ठा ही त्यांची वेगळी ओळख आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास हा माणुसकी, विकास आणि संघर्षशील नेतृत्वाचा विजय होता. आजच्या काळात जातीपातीच्या पलीकडे जाऊन माणूसकी श्रेष्ठ हे सिद्ध करणारे नेतृत्व म्हणून रमेशअप्पा कराड यांच्याकडे पाहिले जाते.

वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि समाजकारणाचा हा प्रवास अधिक बळकट होवो, हीच सदिच्छा!!

**राम कुलकर्णी**
**भाजपा प्रदेश प्रवक्ता**

# आता प्रश्न भारतीय नागरिकत्वाचा

निवडणूक योग्य प्रकारे पार पाडणे आणि त्यासाठी मतदार यादी निर्दोष करणे ही निवडणूक आयोगाची मुख्य जबाबदारी आहे. नागरिकत्वाची पडताळणी हा राजकीय वादाचा मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. मतदार याद्यांची विशेष तीव्र पडताळणी वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हा निकाल मूलत: बिहारमध्ये झालेल्या मतदार याद्यांच्या पडताळणीच्या संदर्भात असला तरी तो देशभर झालेल्या व होणार्या पडताळणींनाही लागू होणार आहे. 'एसआयआर' या नावाने ओळखली जाणारी ही मोहीम 'अनमान धपक्याची' आणि नागरिकांची नावे वगळणारी असल्याचा, या मोहिमेस विरोध करणार्यांचा आक्षेप सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. केवळ मतदान करणे म्हणजे लोकशाही नाही, तर सरकार निवडण्याच्या प्रक्रियेत भाग घेणार्या व्यक्तींची ओळख पटवणेही महत्त्वाचे आहे, अशा आशयाचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. निवडणुका न्याय्य आणि मुक्त वातावरणात होण्यासाठी मतदार याद्या बिनचूक व विश्वासार्ह असणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी जे पुरावे निवडणूक आयोगाने ठरवले आहेत तेही सर्वोच्च न्यायालयाने योग्य मानले आहेत. मतदार यादीत नाव समाविष्ट करू इच्छिणार्या व्यक्तीच्या नागरिकत्वाची 'प्राथमिक चौकशी' करण्याचा निवडणूक आयोगास हक्क असल्याचे न्यायालयाने मान्य केले आहे; मात्र आयोगाचा निर्णय अंतिम नसेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

**जबाबदारी मतदारांवर**

मतदार याद्यांची विशेष तीव्र पडताळणी मोहीम प्रथम बिहारमध्ये राबवली गेली. तेव्हा २००३ ची मतदार यादी आधारभूत धरली होती. या पडताळणी मोहिमेत राज्यातील सुमारे २७ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती. त्यासाठी निवडणूक आयोगाने कोणतेही ठाम कारण दिले नव्हते. त्यामुळेच ही मोहीम अवैध असल्याचा आरोप करत त्यास आव्हान देण्यात आले होते. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स ही स्वयंसेवी संघटना, तृणमूल काँग्रेस, काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल हे पक्ष यांनी केलेले अर्ज न्यायालयाने निकाली काढले आहेत. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विशेष तीव्र पडताळणी मोहिमेत सुमारे ९० लाख नावे वगळण्यात आली होती. त्यात अल्पसंख्याक समाजातील मतदारांची नावे मोठ्या संख्येने वगळली गेल्याचे विविध वृत्तांवरून दिसले होते. आवश्यक पुरावे सादर करूनही नावे वगळली गेल्याच्याही तक्रारी होत्या. त्या आधारे, केंद्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या आदेशावरून निवडणूक आयोग



ही मोहीम राबवत असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. या मोहिमेस 'नागरिकत्वाची पडताळणी' करण्यास जोडले गेल्याचे सरकारी विधानांवरून जाणवत होते; परंतु, 'एसआयआर' मुख्यत्वे एखादी व्यक्ती पात्र मतदार आहे, की नाही हे ठरवण्यापुरतीच मर्यादित आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. मतदार यादीतून नाव वगळले असले तरी त्याचा अर्थ ती व्यक्ती नागरिक नाही असा होत नाही; असेही न्यायालयाने म्हटले आहे. ज्यांची नावे वगळली आहेत त्यांच्या नागरिकत्वाची खातरजमा करण्यासाठी ती नावे गृह खात्याकडे चार आठवड्यांत पाठवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. निवडणूक आयोगास नागरिकत्व पडताळणीचे अधिकार नाहीतच हा आक्षेप जरी फेटाळला जात असला तरी नागरिकत्वाचा अंतिम निर्णय आयोग घेऊ शकत नाही असेही दिसते. हा विसंगतीचा भाग आहे. केवळ भारतीय नागरिक मतदान करू शकतो अशी घटनेत तरतूद असल्याने नागरिकत्वाची पडताळणी आपण करू शकतो असा आयोगाचा दावा आहे; परंतु हा अधिकार मर्यादित असल्याचे हा निकाल स्पष्ट करतो. घटनेने सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा हक्क दिला आहे. साहजिकच आपण पात्र मतदार आहोत, तसेच भारताचे नागरिकही आहोत हे सिद्ध करण्याची जबाबदारी मतदारावर येते. मतदार याद्यांची सुधारणा करताना त्यात जास्तीत जास्त नागरिकांचा समावेश करण्याची जबाबदारी आयोगावर आहे. आयोग ज्यांचे नाव वगळेल ते घटनात्मक हक्कापासून वंचित राहतील. येथे एका प्रकारे घटनात्मक पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. दोघांच्या अधिकारांचा योग्य मेळ घालण्याची जबाबदारी आयोगावर आहे

# तोरणमाळ

उंचीने

महाबळेश्वर पाठोपाठ महाराष्ट्रातील द्वितीय क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण म्हणजे नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ होय. समुद्रसपाटीपासून ११४३ मीटर उंचीवर असलेले हे स्थान सातपुडा पर्वतरांगांमध्ये आहे. राज्यातील इतर पर्यटन स्थळांप्रमाणे विकसित न झाल्याने हे स्थान केवळ उत्तर महाराष्ट्रातील पर्यटकांचेच विशेष आकर्षण आहे. तोरणमाळ हे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव थंड हवेचे ठिकाण आहे (खानदेशच्या जनतेच्या आवडीचे सापुतारा हे स्थळ गुजरात राज्यात येते.) जवळपास कुठल्याही शहराचा आणि वर्दळीचा अभाव या कारणांनी तोरणमाळने आपले नैसर्गिक सौंदर्य जपले आहे.

**तोरणमाळ येथील प्रमुख आकर्षण**

१) सात पायरीचा घाट – घाट चढून गेल्यावर शेवटच्या उंच टोकावरून रस्त्याकडे पाहिल्यास एका खाली एक सात पायऱ्या दिसतात. हा घाट तोरणमाळ पासून ४ किमी आधी सुरु होतो. सात पायरी घाटाच्या पायथ्याशी काळा पाणी नावाचा पहाड आहे. गंभीर गुन्हे केलेल्या कैद्यांना इंग्रज या पहाडावरून लोटून देत असत. तोरणमाळ माथ्याच्या सुरुवातीलाच असलेल्या एका गुहेत अर्जुनाची आदि मानवाच्या अवस्थेतील मूर्ती आहे म्हणून त्याला नागार्जुनाची गुहा असेही म्हणतात.

**२) सिताखाई पॉइंट (सिता गुफा) –** तोरणमाळच्या ईशान्य भागात सिताखाई पॉइंट आहे. प्रचलित आख्यायिकेनुसार प्रभू रामचंद्र सितेसोबत या भागातून जात असताना या ठिकाणी रथ अडकून गुफा तयार झाली. येथे रथाच्या दोन चाकांची तसेच घोड्याच्या खुरांच्या खुणा आजही स्पष्ट दिसतात. भौगोलिकदृष्ट्या ही गुफा पाषाण आणि उंच सुळक्यांनी वेढलेली आहे. सीतेला तहान लागली असता प्रभू रामचंद्रांनी पृथ्वीच्या पोटात बाण मारून भूगर्भातील जल बाहेर काढले. ते स्थळ आज सिताकुंड म्हणून ओळखले जाते. सिताखाई धबधब्यातून वाहणारे पाणी पुढे सरकल नदीला जाऊन मिळते. पुढे ही नदी नर्मदेस मिळते.



**३) यशवंत तलाव** –वर्षातील बाराही महिने पाणी असणाऱ्या तोरणमाळ मधील या तलावाची मोहिनी राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यावरही पडली होती. त्यांच्या भेटीनंतर २६ सप्टेंबर १९६९ पासून या तलावाचे यशवंत तलाव असे नाव नामकरण झाले. या तलावाचे मूळ नाव अज्ञात आहे. या ठिकाणी बोटिंगची सोय उपलब्ध आहे. तलावातील पाणी पुढे सिताखाईच्या धबधब्याला जाऊन मिळते.



गोरक्षनाथ मंदिर, खडकी पॉइंट, पुरातन किल्ला हे स्थळ, सूर्योदय आणि सूर्यास्थाचे विलोभनीय दृश्य ही तोरणमाळची इतर

# संत चोखामेळा

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरु होते. सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले. ते शूद्र अतिशूद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात ते अडकले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ . उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, मात्र विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. दैन्य, दारिद्र्य, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते परंतु प्रत्यक्ष परमेश्र्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. इतरांप्रमाणे आपणही श्रीविठ्ठलाला उराउरी भेटावे असे खूप वाटत होते परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती.

चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवांमुळे १३व्या शतकात उदयाला आली. म्हणून संत चोखोबा म्हणतात, 'खटनट यावे, शुद्ध होऊनी जावे। दवंडी पिटीभावे डोळा।।' असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळातील लोकांनाही मिळावी असे सर्वच संतांना प्रांजळपणे वाटत होते. त्याच वेळी संत चोखोबांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगांतून समाजबांधवांना दिला. संत चोखोबांचे भावविश्र्व अनुभवण्याचा प्रयत्न केला असता, एक मूक आक्रंदनाचा अनुभव येतो. 'हीन मज म्हणती देवा। कैसी घडो तुमची सेवा।' असा उपरोधिक प्रश्न ते देवालाच विचारतात. 'का म्हणून आम्ही या यातना सहन करावयाच्या, भगवंताच्या



लेखी सर्व त्याचीच लेकरे आहेत ना, मग असा दुजाभाव का?' असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊन ते व्यथित होताना दिसतात. त्यांच्या अभंगरचना हृदयाला भिडणाऱ्या आहेत. 'धाव घाली विठू आता। चालू नको मंद। बडवे मज मारिती। ऐसा काही तरी अपराध।।''जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार। बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्ट्यासाठी आलो।।' 'आमुची केली हीन याती। तुज कां न कळे श्रीपती। जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता।।' 'ऊस डोंगा परि । रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।। चोखा डोंगा परि। भाव नोहे डोंगा।।' 'विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी।'हे त्यांचे अभंग जनमानसामध्ये आजही लोकप्रिय आहेत. या सर्वांचे विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते संत चोखोबा मंगळवेढ्याचे होते. त्यांना उपेक्षित बांधवांच्या उध्दाराची सतत चिंता होती. त्यांना समान हक्क मिळावेत, समाजातील तेढ कमी व्हावी, जातींमधील संघर्षाची भ्रामक कल्पना नष्ट व्हावी यासाठी त्यांनी भक्तिमार्गाद्वारे प्रयत्न केले. गावगाड्यातील गावकुसाचे काम चालू असताना भिंत पडून सर्व कामगारांचा अंत झाला. चोखोबाही त्यात होते. संत नामदेवांनी जेव्हा सर्व अस्थी गोळा केल्या तेव्हा ज्या अस्थीतून 'विठ्ठल विठ्ठल' असा नाद ऐकू आला त्या अस्थी चोखोबाच्या होत्या असे म्हणतात. नामदेवांनी मात्र चोखोबांना विठठलाजवळच अढळ स्थान दिले. पंढरपूरच्या देवळाच्या महाद्वारात पायरी जवळ नामदेवांनी संत चोखोबांची समाधी बांधली आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




**ग्रीन टी**–जेव्हा मोठया प्रमाणात स्वास्थ्य लाभ हवा असेल आणि तो कशानी मिळेल असा जर कुणी प्रश्न केला तर सर्वात वरच्या क्रमांकावर ग्रीन टीचे नाव येईल. ग्रीन टी तुम्हाला सुंदर बनवते. कँसर पासुन दुर ठेवते शिवाय तुमच्या त्वचेला स्वच्छ देखील ठेवते आणि तुमच्या चेहे–याला लागणा–या आवश्यक तत्वांनाही पुर्ण करते.जे लोक सतत ३ महिने ग्रीन टी चे सेवन करतात त्यांची त्वचा ग्रीन टी चे सेवन न करणा–यांच्या तुलनेत जास्त मुलायम स्वस्थ आणि कोमल असते. आणि हे सर्व याकरता होतं कारण यात महत्व–पुर्ण तत्व जसे कैटेचीन, एत्रछउत्र असतात जे आपल्या शरीरात ऑक्सीजनच्या प्रवाहाला वाढवतात.

## २ Joke विनोद




बगारामला एकदा एका जुन्या पडक्या इमारतीत रात्र घालविण्याचा प्रसंग आला. वॉचमनला बगारामने विचारले, काय रे बाबा, इथे या खोलीत काही विशेष घटना घडली आहे का ? गेल्या २५ वर्षात तरी नाही घडलेली वॉचमन म्हणाला, म्हणजे २५ वर्षांपुर्वी काय विशेष घडले होते ? बगारामने उत्सुकतेने विचारले. वॉचमन म्हणाला, २५ वर्षापूर्वी एक माणूस इथे याच खोलीत रात्रभर राहिला आणि सुखरुप घरी निघून गेला होता.

## ३ Message संदेश



Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## ४ Thought सुविचार

प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.– पु.ल. देशपांडे




**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ




# सलमान खानकडून फॅन्सना खास भेट

सलमान खान (डरश्रारप घहरप) सध्या आपल्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'मातृभूमी' (चर्रीीलिहेळ) या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. काही कारणास्तव या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. सलमान खान चे फॅन्स आणि प्रेक्षकवर्ग 'मातृभूमी' या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, 'मातृभूमी' या सिनेमाचं नवीन गाणं नुकतेच रिलीज झाले आहे. ईदच्या खास प्रसंगी 'मातृभूमी' या चित्रपटाच 'मैं हूं' हे गाणं प्रदर्शित झालं आहे. गुरुवारी सकाळी सलमान खानने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर आपल्या आगामी चित्रपटाच्या गाण्याचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. या गाण्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



दक्षिण लेबनॉनवर इस्रायलचा महाविनाशक हल्ला; 'टायर' शहर धुराच्या विळख्यात

दक्षिण लेबनॉनमधील परिस्थिती चिघळली असून इस्रायली हवाई दलाने (ख-ऋ) हिजबुल्लाहच्या तळांवर आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि विध्वंसक हल्ला केला आहे. ...

सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओ मध्ये सलमान खानसोबत चित्रांगदा सिंह दिसत आहे. हे गाणे पार्टी साँग किंवा रोमँटिक नसून, एक अत्यंत दु:खद आणि भावनिक गाणं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या गाण्यात काही बदल केले जात आहे. सलमान खानने या सिनेमातील गाण्याचा टीझर रिलीज केला आहे. गाण्याचा टीझर शेअर करत त्यानं लक्षवेधी कॅप्शन दिलं आहे.

सलमान खानने व्हिडीओ पाठवत असं लिहिलं आहे. हा गाण्याचा व्हिडीओ समोर येताच सलमान खानच्या चाहत्याना प्रचंड आनंद झाला आहे. या गाण्याला प्रेक्षकांकडूनही पसंती मिळत आहे. अनेक लोकांनी कमेंट सेक्शनमध्ये 'ईद'च्या शुभेच्छा दिल्या आहेत. एकानं कमेंटमध्ये, 'ईद मुबारक, मी तुमच्याच पोस्टची वाट पाहत होतो', असं म्हटलं आहे.हे नवीन गाणं सलमान खान आणि चित्रांगदा या दोघांवर केंद्रीत आहे. या गाण्यात प्रेम आणि जोडीदारापासून दूर राहण्याची तळमळ देखील दिसून येते. या दोन्ही भावना या गाण्यातून स्पष्ट दिसत आहेत. हा व्हिडीओ पूर्णपणे ब्लॅक अँड व्हाईट आहे. 'मैं हूं' या गाण्याच्या ओरिजनल वर्जनमध्ये एका सैनिकाच्या परिवाराचा प्रवास दाखवण्यात आला आहे. या गाण्यात आनंदाचे क्षण आणि जोडीदारापासून दूर जाण्याचे दु:ख देखील दाखवण्यात आले आहे. हे गाणं श्रेया घोषाल आणि अयानलाल यांनी गायले असून, हे गाणं आपल्या शूर सैनिकांनी केलेल्या त्यागाचे प्रदर्शन करते.

# मराठी अस्मितेचा जागर होणार! मालिकेत झळकणार, सोशल मीडिया स्टार श्रद्धा पवार

वाहिनीवर नव्या मालिकांचा हंगाम सुरू झाला असून आता आणखी एक वेगळ्या विषयाची मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'मराठी मिडीयम' या नव्या मालिकेच्या माध्यमातून मराठी शाळांच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.श्रद्धाच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर चर्चेला सुरुवातही केली आहे. डींरी झीरींह वाहिनेने 'मराठी मिडीयम' या मालिकेच्या माध्यमातून मराठी शाळांचा जागर करण्यास शुभारंभ केला आहे. डींरी झीरींह वाहिनीवर नव्या मालिकांचा हंगाम सुरु झाला आहे. पावसाच्या पहिल्या थेंबासह स्टार प्रवाह मालिकांची सरही घेऊन येत आहे. या पहिल्या पावसाच्या सुगंधासह मालिकाप्रेमींना नव्या मालिकेचा आनंद घेता येणार आहे. अशामध्ये युवकांसाठी आनंदाची बातमी आहे. तरुणांची लाडकी ठशशश्रीीरी डहीरववहर झुरी आता मालिका क्षेत्रात पदार्पण करत आहे. सोशल मीडिया स्टार ते अभिनेत्री या प्रवासाला तिने सुरुवात केली आहे.

काळापासून अनेक ठिकाणी मराठी शाळांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही ठिकाणी तोडल्या जात आहेत तर काही ठिकाणी या शाळा अवैध स्वरूपात फसल्या किंवा फसवल्या गेल्या आहेत. अशामध्ये या मराठी शाळांचा जागर करणे महत्वाचे होते आणि ते करण्याचे कार्य डींरी झीरींह वाहिनेने 'मराठी मिडीयम' या मालिकेच्या माध्यमातून करण्यास शुभारंभ केला आहे.

पाहिले तर लक्षात येईल की अक्षयला असे पात्र देण्यात आले आहे जो मराठी शाळेच्या विरोधात आहे. त्याला मराठी शाळा पाडायची



तर तिच्या सोबतीला मुख्य भूमिकेत अभिनेता अक्षय नलावडे झळकणार आहे. श्रद्धाच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर चर्चेला सुरुवातही केली आहे आणि या मालिकेचा उत्साह दिसून येत आहे.८ थररक्षींप १३ चळपळींश : थ्रिल अनुभवण्यासाठी व्हा सज्ज! सुनील बर्वे आणि ऐश्वर्या नारकर पहिल्यांदाच एकत्र प्रदर्शित झाला प्रोमो! 'मराठी मिडीयम' या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित करण्यात आला आहे. मालिकेत मुख्य भूमिकेत श्रद्धा पवार आणि अक्षय नलावडे झळकणार आहेत. मराठी शाळांच्या अस्मितेवर ही मालिका आधारित आहे. एकंदरीत, राज्यात गेल्या काही



आहे पण शाळेच्या रक्षणाकरिता ठामपणे उभ्या असलेल्या शिक्षिकेचे पात्र श्रद्धा साकारणार असल्याचे झीी मध्ये दिसून आले आहे. 'भूतम भयम' : नवा कोरा हॉरर मराठी सिनेमा! खरंच हॉरर कॉमेडी विश्वातला गेमचेंजर? 'या' तारखेला मिळणार उत्तर काय आहे मालिकाप्रेमींचे म्हणणे? डींरी झीरींह ने 'मराठी मिडीयम' या मालिकेचा प्रोमो त्यांच्या सर्व सोशल माध्यमांवर शेअर केला आहे. प्रत्येक ठिकाणी या मालिकेला भरभरून प्रतिसाद आला आहे. त्यापैकी महत्वाची कमेंट म्हणजे अनेकांनी डींरी झीरींह ला त्यांच्या आवडत्या मालिकेचे नाव लिहत विनंती केली आहे की या-या मालिकेची वेळ कृपया करून बदलू नका. अखेर, बहुतेक चाहत्यांना 'मराठी मीडियम' या मालिकेचा विषय पटला आहे आणि या मालिकेची आता नितांत गरज असल्याचे अनेकांनी म्हंटले आहे.

# ३ व्या वर्षी युधवीरची कमाल; ठरला मोस्ट पॉप्युलर स्टार

या ाठवड्यात खचऊ्ल च्या यादीत पहिल्या क्रमांकावर असलेला स्टार दुसरा कोणी नसून तरुण अभिनेता युधवीर अहलावत आहे.यामुळे चित्रपटसृष्टीतील दिग्गजांपासून ते सामान्य प्रेक्षकांपर्यंत सर्वजणच आश्चर्यचकित झाले आहेत.

इंटरनेट मूव्ही डेटाबेस (खचऊ्ल) दर आठवड्याला सर्वात लोकप्रिय भारतीय सेलिब्रिटींची यादी प्रसिद्ध करतो. सर्वसाधारणपणे असे मानले जाते की, ज्या कलाकारांचे मोठे चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत असतात किंवा ज्यांचा मोठा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होतो, ते या यादीत अग्रस्थानी असतात. पण या वर्षीच्या टॉप ३० यादीने चित्रपटसृष्टीतील दिग्गजांपासून ते सामान्य प्रेक्षकांपर्यंत सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे.खरं तर, या आठवड्यात एका लहान बालकलाकाराने लोकप्रियतेच्या बाबतीत ऐश्वर्या राय, थलपथी विजय, मोहनलाल आणि शा-हरुख खान यांसारख्या सुपरस्टार्सना मागे टाकले आहे. या आठवड्याच्या शर्यतीत एका अशा नावाने अव्वल स्थान पटकावले आहे, ज्याची कोणीही अपेक्षा केली नव्हती.

या आठवड्यात खचऊ्ल च्या यादीत पहिल्या क्रमांकावर असलेला स्टार दुसरा कोणी नसून तरुण अभिनेता युधवीर अहलावत आहे. सैफ अली खान मुख्य भूमिकेत असलेल्या नेटफ्लिक्सच्या 'कर्तव्य' या चित्रपटातील उत्कृष्ट सहाय्यक भूमिकेमुळे युधवीर चर्चेत आहे. या कथेमध्ये, युधवीर एका निरागस १४ वर्षांच्या



मुलाची भूमिका साकारतो, ज्याला काही लोक खून (एक 'हिट जॉब') करण्यासाठी प्रवृत्त करतात. यानंतर, सैफ अली खानचे पात्र (एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिका) त्या मुलाला वाचवण्यासाठी संघर्ष करतो. पैशांची बॅग हरवली, ओळख नसतानाही सई ताम्हणकरने दिला मदतीचा हात, प्रवीण तरडेंनी सांगितला परदेशातला न विसरता येणारा प्रसंग 'कर्तव्य' या चित्रपटातील युधवीरच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. समीक्षकांपासून ते सोशल मीडियावरील सामान्य जनतेपर्यंत, प्रत्येकजण त्याच्या अभिनयाने मोहित झाला आहे. या कौतुकामुळे हा तरुण कोण आहे, याबद्दल लोकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. परिणामी, १५ मे रोजी नेटफ्लिक्सवर चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर, त्याच्याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी लोकांनी त्याचे आयएमडीबी प्रोफाइल वेगाने शोधायला सुरुवात केली. या प्रचंड प्रतिसादामुळे तो रात-ोरात पहिल्या क्रमांकावर पोहोचला.मूळचा हरियाणाचा असलेल्या युधवीरने २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'सांड की आँख' या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर तो 'लव्ह हॉस्टेल' या चित्रपटात आणि 'को-एड' या वेब सीरिजमध्ये दिसला आहे. विशेष म्हणजे, युधवीर पडद्यावर खूप तरुण दिसत असला तरी, त्याने स्वत: एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे की तो आता अल्पवयीन नाही. ऐश्वर्या राय आणि थलपथी विजय यांसारख्या दिग्गजांना टाकले मागे युधवीरच्या यशातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याने ऐश्वर्या राय आणि थलपथी विजय यांसारख्या दिग्गजांना मागे टाकले आहे. कान्स चित्रपट महोत्सवातील सहभागामुळे ऐश्वर्या या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

तर तामिळनाडूचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर विजय

# येणारा डॉन ३ वादावर सलमान खानचा हस्तक्षेप

रणवीर-फरहान वाद मिटणार का? रणवीर सिंग सध्या त्याच्या 'डॉन ३' या चित्रपटावरून निर्माण झालेल्या वादात अडकला असून आता सलमान खानने रणवीर सिंग आणि फरहान अख्तर यांच्यातील या वादात हस्तक्षेप करत, या संघर्षात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला आहे.

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग सध्या त्याच्या 'डॉन ३' या चित्रपटावरून निर्माण झालेल्या वादात अडकला आहे. फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजने (ऋथखउए) चित्रीकरण सुरू होण्यापूर्वीच त्याच्यावर चित्रपटासाठी बंदी घातली. या प्रकरणामुळे चित्रपटसृष्टीत एक मोठी चर्चा सुरू झाली आहे. आता सलमान खानने रणवीर सिंग आणि फरहान अख्तर यांच्यातील या वादात हस्त-क्षेप करत, या संघर्षात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला आहे.

सलमान खानला चित्रपटसृष्टीचा गॉडफादर असे उगाच म्हटले जात नाही. यामागे एक कारण आहे: हा सुपरस्टार नेहमीच कठीण काळात लोकांच्या पाठीशी उभा राहतो. 'डॉन ३' वरून





रणवीर सिंग आणि फरहान अख्तर यांच्यातील वाद वाढत असल्याचे पाहून, सलमान खानने मध्यस्थी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, जेणेकरून दोन्ही पक्ष कोणताही मीडिया सर्कस न करता आपापले प्रश्न सामंजस्याने सोडवतील.

बॉलिवूड हंगामाच्या एका वृत्तानुसार, एका सूत्राने असे म्हटले आहे की, सलमान खानला रणवीर सिंग खूप आवडतो आणि अख्तर कुटुंबही त्याच्या हृदयाच्या तितकेच जवळ आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्याने दोन्ही पक्षांशी संवाद साधला आणि आपापल्या प्रकल्पांच्या भविष्याला धक्का न लावता आपले प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले.

रिपोर्टमधील सूत्रांनी पुढे म्हटले आहे की, सलमानने दोन्ही पक्षांना स्वत: ला एकाच इंडस्ट्रीचा भाग समजून वाद मिटल्यानंतर दुसऱ्या प्रोजेक्टवर एकत्र काम करण्याचा आग्रह केला आहे.

शाहरूख खानपासून ते आलिया भट्टपर्यंत, घरीरप गेहरी ने अनेक बॉलिवूड स्टार्सना केलं अनफॉलो, नेमकं कारण काय?

सलमानला कोणताही कायदेशीर अडथळा नको असे म्हटले जात आहे की, फरहान आणि रण-वीर दोघांनीही सलमान खानची मते समजून घेतली आहेत आणि त्याचा सल्ला गांभीर्याने घेतला आहे. आता ते कोणत्याही वादाशिवाय सामंजस्यपूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहेत. असे वृत्त आहे की, सलमान खानला रणवीर आणि फरहान यांच्यात कोणतीही कायदेशीर गुंतागुंत नको आहे, तसेच चित्रपट एजन्सींनी कोणताही अविचारी निर्णय घ्यावा असेही त्याला वाटत नाही.

असे म्हटले जाते की, झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी सलमान फरहानच्या पाठीशी उभा आहे आणि 'धुरंधर'च्या ऐतिहासिक यशाचा फायदा घेण्यासाठी रण-वीरला नवीन प्रोजेक्ट सुरू करण्यास प्रोत्साहन देत आहे.

चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होण्याच्या अवघ्या तीन आठवड्यांपूर्वी रणवीर सिंगने चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला. खरं तर, फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजने (ऋथखउए) अलीकडेच रणवीर सिंगविरुद्ध असहकाराचा आदेश जारी केला आहे. 'डॉन ३' चे निर्माते फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी फेडरेशनकडे तक्रार केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. तक्रारीत म्हटले होते की, रणवीर सिंगने अचानक चित्रपट सोडल्यामुळे त्यांना मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. निर्मात्यांना अंदाजे ४५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. या वादानंतर, ऋथखउए चे मुख्य सल्लागार अश-ोक पंडित यांनी सांगितले की, चित्रीकरण सुरू होण्याच्या अवघ्या तीन आठवड्यांपूर्वी रणवीर सिंगने चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला. तोपर्यंत चित्रपटाची जवळपास सर्व तयारी पूर्ण झाली होती. चित्रीकरणाचे ठिकाण निश्चित झाले होते, हॉटेल्स बुक झाली होती आणि चित्रीकरणासाठी परवानगीही घेण्यात आली होती.

# 'भारत भाग्य विधाता'चा मोशन पोस्टर रिलीज

## बलिदान आणि एकतेची कहाणी उलगडणार



बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाच्या निर्मात्यांनी आज एक दमदार मोशन पोस्टर प्रदर्शित केले. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

विस्तार-बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाचे प्रभावी मोशन पोस्टर आज प्रदर्शित झाले. या पोस्टरमध्ये कंगना रक्ताने माखलेल्या जखमी अवस्थेत दिसत आहे. तिच्याभोवती आगीच्या ज्वाला दिसत आहेत. हा चित्रपट शौर्य, माणुसकी, त्याग आणि एकतेची कथा सादर करेल. कंगनाने तिच्या 'भारत भाग्य विधा-



ता' या चित्रपटाचे मोशन पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले आहे. त्यासोबत कंगनाने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'काहीतरी विशेष केल्यानंतर, ते त्याला सामान्य म्हणतात. ते दिसतात, पण दिसत नाहीत.'प्रेक्षक कंगना रणौतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्यादरम्यान कामा हॉस्पिटलमधील नर्सेस आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या शौर्यावर आधारित या चित्रपटात कंगनाने एका नर्सची मुख्य भूमिका साकारली आहे. 'भारत भाग्य विधाता'ची निर्माती कंगना रणौत आहे. मनोज तापारिया हे या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक आहेत.

कंगनाचा 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट इम्तियाज अलीच्या 'मैं वापस आऊंगा'शी स्पर्धा करेल. हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित होत असून यात दिलजीत दोसांझ, शर्वरी वाघ आणि वेदांग रैना यांच्या भूमिका आहेत. विक्रम भट्टचा हॉरर चित्रपट हॉन्टेड ३डी: इकोज ऑफ द पास्ट आणि मनोज बाजपेयीचा गव्हर्नर: द सायलेंट सेव्हिअर देखील त्याच दिवशी चित्रपटगृहात दाखल

# ओळख नसतानाही सई ताम्हणकरने दिला मदतीचा हात

प्रवीण तरडेंनी सांगितला परदेशातला न विसरता येणारा प्रसंग

मराठी चित्रपटसृष्टीतल्या एकोप्याबद्दल बरेच काही बोललं जातं.याच संदर्भात दिग्दर्शक प्रवणी तरडे यांनी एक खास किस्सा शेअर केला आहे. मराठी सिनेइंडस्ट्रीतल सध्या देऊळ बंद २ आता परीक्षा देवाची या बहुचर्चित चित्रपटाची क्रेझ सर्वत्र सुरू आहे. या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्रातून भरभरून प्रेम मिळताना दिसत आहे. प्रवीण तरडे सध्या त्यांच्या या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई करताना दिसत आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत प्रवीण तरडे यांनी सिनेइंडस्ट्रीतल्या काही चांगल्या वाईट गोष्टींबद्दल सांगितले आहे.मराठी चित्रपटसृष्टीतल्या एकोप्याबद्दल बरेच काही बोललं जातं.याच संदर्भात दिग्दर्शक प्रवणी तरडे यांनी एक खास किस्सा शेअर केला आहे.त्यांनी सांगितले की इंडस्ट्रीतले कलाकार कधीच कठीण काळात एकटं सोडत नाहीत. परदेशात असताना बॅग चोरीला गेली होती, तेव्हा सई ताम्हणकर, स्वप्नील जोशी यांनी त्यांना कशी मदत केली होती.



# रासायनिक खतांसह बियाणांचा तुटवडा: कृषी विभागाची विक्री केंद्रावर तपासणी, बियाणे खरेदीत फसवणूक टाळण्यासाठी पक्क्या पावतीची सक्ती



**लातूर/ प्रतिनिधी:** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे व खतांच्या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक लूट होऊ नये, यासाठी लातूर कृषी विभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली लातूर शहरातील विविध कृषी नि विष्ठा (खते, बियाणे व औषधे) विक्री केंद्रांची धडक तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

यंदा 'एल निनो'च्या सावटामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे कमी कालावधीत येणाऱ्या बियाण्यांची आणि युरिया, डीएपी या खतांची बाजारात मागणी वाढली आहे. याचाच फायदा घेत कृत्रिम टंचाई निर्माण करणे, जादा दराने विक्री करणे किंवा बोगस बियाणे विकणे असे प्रकार घडू शकतात. हे रोखण्यासाठी कृषी विभागाने ही झाडाझडती सुरू केली आहे.या मोहिमेअंतर्गत अधिकाऱ्यांनी दुकानांमधील साठ्याची प्रत्यक्ष तपासणी केली असून, दर्जा तपासण्यासाठी निविष्ठांचे नमुनेही घेतले आहेत. सर्व कृषी सेवा केंद्र चालकांनी दुकानातील भावफलक आणि साठा फलक दररोज अद्ययावत ठेवावा, शेतकऱ्यांना खरेदीची पक्की पावती द्यावी आणि शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सक्त सूचना राजेंद्र कदम यांनी दिल्या आहेत. या नियमांचे उल्लंघन केल्यास थेट परवाना रद्द करण्यासह कडक कायदेशीर कारवाईचा इशारा दिला.

लातूर जिल्ह्यात जूनमध्ये चांगला, जुलैमध्ये मध्यम तर ऑगस्टमध्ये तुरळक पाऊस पडेल. एल निनोमुळे मान्सून वारे कमकुवत होऊन सरासरीपेक्षा १० ते २० टक्के पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान तज्ज्ञ डॉ. शेख महंमद बाबर यांनी वर्तवली आहे. सप्टेंबरमध्ये पुन्हा पाऊस येऊ शकतो, तापमानाचा फटका पिकांना बसू शकतो.

यंदा ऑगस्ट महिन्यात पावसाचा खंड पडण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी कमी पाण्यात जास्त उत्पन्न देणाऱ्या आणि लवकर येणाऱ्या वाणांची निवड करावी. आंतरपीक पद्धतीचा वापर केल्यास जोखीम कमी होईल. काही खतांच्या दरामुळे त्यांना अधिक मागणी आहे. पिकांची दोन दिवसांत बाजारात आवक वाढेल. संतोष लाळगे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक

ऑगस्टमध्ये पावसाचा खंड पडण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी लवकर येणाऱ्या वाणांची निवड करावी. आंतरपीक पद्धती आणि ठिबक सिंचनाचा वापर करावा, जेणेकरून जोखीम कमी होईल.

## जात प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी आल्यास हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि विविध शासन निर्णयामधील तरतुदींनुसार पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने लातूर जिल्ह्यात लातूर, औसा-रेणापूर, निलंगा, अहमदपूर आणि उदगीर अशा पाच उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

नागरिकांनी जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. तसेच जात प्रमाणपत्र ऑनलाईन पोर्टलवरून काढताना काही अडचणी किंवा समस्या येत असल्यास, अथवा कोणतीही फसवणूक होत असल्यास नागरिकांनी त्याबाबतची तक्रार प्रशासनाच्या ०२३८२-२२०२०० या दूरध्वनी क्रमांकावर करावी, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

# बौद्ध विहारे ही प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत : डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी

**नांदगाव/प्रतिनिधी:** समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक चळवळीची आज नितांत आवश्यकता आहे. विशेषतः युवकांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येऊ शकते.यासाठी बौध्द विहारांची भूमिका महत्त्वपूर्ण असून बौध्द विहारे ही प्रबोधनाची केंद्र बनली पाहिजे असे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.




मौजे नांदगांव येथील आम्रपाली बुद्ध विहारामध्ये भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते.या कार्यक्रमास काळेगाव येथील पूज्य भंते महाविरो थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

यावेळी श्रामनेर सोनूत्तर,श्रामनेर राहूल, भारतीय बौध्द महासभेचे प्रा.बापू वाघमारे,दिनेश कांबळे,गौतम बनसोडे,राज भालेराव,मारोती कांबळे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, बौद्ध विहारे ही केवळ धार्मिक उपासनेची केंद्रे नसून ती सामाजिक आणि वैचारिक प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत. प्रत्येक बुद्ध विहारामध्ये दर्जेदार साहित्य असलेले पुस्तक कपाट अथवा ग्रंथालय उभारण्याची गरज आहे. पुस्तके ही ज्ञान, विचार आणि प्रगतीची साधने असून त्यांच्यामुळेच माणसाच्या बुद्धीचा विकास होतो. त्यामुळे वाचन संस्कृती वाढविण्यासाठी समाजाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा संदेश आत्मसात करून युवकांनी समाज परिवर्तनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या वेळेस प्रा. बापू वाघमारे यांचे समायोचीत भाषणे झाली.तर पूज्य महाविरो थेरो यांच्या धम्मदेसनेनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# महागाई आणि इंधन दरवाढीविरोधात निलंग्यात युवक काँग्रेसचे अनोखे मेलोडी आंदोलन

**निलंगा/मोईत सितारी:** देशात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किंमती आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात अभय दादा सोळुंके जिल्हा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या वतीने निलंगा येथे अनोखे आंदोलन करण्यात आले. शहरातील पेट्रोल पंप परिसरात झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी नागरिकांना मेलोडी चॉकलेट वाटप करून केंद्र सरकारचा निषेध नोंदवला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या मेलोडी रिलच्या माध्यमातून जनतेच्या समस्यांची थट्टा करण्यात आल्याचा आरोप करत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि युवकांचे जीवन कठीण झाले असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.



या आंदोलनात महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश लहू म्हेत्रे, निलंगा तालुका काँग्रेस अध्यक्ष विजयकुमार पाटील, प्रशांत वांजरवाडे, बालाजी सूर्यवंशी, किशोर पाटील, सतीश रुपणर, बाळू दिगंबरे, पंकज क्षीरसागर, मास शिंदे, सूरज पेटकर तसेच युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

केंद्र सरकारने तातडीने पेट्रोल-डिझेल दर कमी करून महागाई नियंत्रणात आणावी, अन्यथा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी 'बेनिफिशरी सत्यापन ॲप'द्वारे डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे, २०२६ च्या शासन निर्णयानुसार, विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांसाठी आता हयात प्रमाणपत्र (डिजीटल लाईफ सर्टिफिकेट) ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लातूर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इतर सर्व विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र विहित पद्धतीने सादर करावे, असे आवाहन लातूर तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**मोबाईल किंवा सेतू केंद्रावरून सुविधा उपलब्ध**

लाभार्थ्यांना हे प्रमाणपत्र सादर करणे सोपे जावे यासाठी 'बेनिफिशरी सत्यापन प' विकसित करण्यात आले आहे. लाभार्थी हे प्रमाणपत्र स्वतःच्या किंवा आपल्या नातेवाईकांच्या मोबाईलवरून या पचा वापर करून सादर करू शकतात. तसेच ज्यांना मोबाईलवर ही प्रक्रिया करणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्राला भेट देऊन आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र काढून घ्यावे.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक लाभार्थ्यांना ही ऑनलाईन प्रक्रिया स्वतः करणे शक्य नसते. अशा वेळी लाभार्थ्यांनी आपल्या नातेवाईकांची मदत घ्यावी अथवा जवळच्या सेतू सुविधा केंद्राचा लाभ घेऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी. जेणेकरून लाभार्थ्यांचे अनुदान विनाअडथळा सुरू राहण्यास मदत होईल, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# मराठवाडास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत २७ संघांचा थरार: धाराशिवच्या संघास मिळाले उपविजेतेपद

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर तालुक्यातील कासारखेडा येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त आयोजित मराठवाडास्तरीय खुल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूरच्या 'महाराष्ट्र व्हॉलीबॉल क्लब'ने विजेतेपद पटकावले. त्यांनी अटीतटीच्या अंतिम सामन्यात धाराशिवच्या संघाचा २-१ असा पराभव केला. कासारखेडा व्हॉलीबॉल टीमच्या (केव्हीटी) वतीने तीन दिवस या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मराठवाड्यातील तब्बल २७ संघांनी सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे शानदार प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात पहिल्या सेटपासूनच दोन्ही संघांमध्ये जोरदार चढाओढ पाहायला मिळाली. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात महाराष्ट्र क्लबच्या खेळाडूंनी संयमी आणि आक्रमक खेळ करत निर्णायक सेटमध्ये विजय मिळवला. तृतीय क्रमांकावर कासारखेडा



येथील तांबोळी वॉरियर्स संघाने बाजी मारली.

विजेत्या व उपविजेत्या संघांना माजी आमदार वैजनाथ शिंदे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव आणि माजी जि.प. अध्यक्ष संतोष देशमुख यांच्या हस्ते रोख रक्कम, चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सभापती श्रीकांत कैले, उपसभापती महेश चव्हाण, जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव दत्ताभाऊ सोमवंशी, उपाध्यक्ष महेश पाळणे, डॉ. निलेश पौळ आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेसाठी जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या पंचांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली.

कासारखेडा येथे झालेल्या या स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला. लातूरचा महाराष्ट्र व्हॉलीबॉल क्लब आणि धाराशिव संघ यांच्यात पहिल्या सेटपासूनच विजयासाठी संघर्ष पाहायला मिळाला. लातूरच्या खेळाडूंनी संयम आणि आक्रमकतेचा सुरेख मेळ घालत निर्णायक सेटमध्ये बाजी मारली. या अटीतटीच्या लढतीचा आनंद घेण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी परिसरातील हजारो क्रीडारसिकांनी मोठी गर्दी केली.

प्रथम क्रमांक: महाराष्ट्र व्हॉलीबॉल क्लब, लातूर.
द्वितीय क्रमांक: धाराशिव संघ.
तृतीय क्रमांक: तांबोळी वॉरियर्स, कासारखेडा.

## तांदुळजा येथे खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

**तांदुळजा/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील तांदुळजा येथे मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालय येथे खरीप हंगामपूर्व आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, उगवणक्षमता चाचणी, पक्षी थांबे, जीवामृत, दशपर्णी अर्क, सोयाबीन टोकन पद्धतीने लागवड व बीबीएफ पद्धतीने पेरणी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती देण्यात आली.

पाणी फाउंडेशन गट मार्गदर्शन, कृषी विभागाच्या विविध योजना, एल निनो जनजागृती आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्याचा अनुभव सांगितला. यामुळे उत्पन्नात वाढ कशी होते? याचीही माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तरेश्वर गायकवाड हे होते. यावेळी तांदुळजा येथील सहायक कृषी अधिकारी एस. एस. माळी, गाधवड येथील सहायक कृषी अधिकारी पी. आर. कदम, समूह सहायक पैंगबर सय्यद आदींसह शेतकरी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

# आयटी कंपन्यांमध्ये नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थ्यांचा कॉक्सिटमध्ये सत्कार

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर : येथील कॉक्सिट महाविद्यालयात विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (आयटी) कॅम्पसमुलाखतीतून मोठ्या पॅकेजची नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थी व पालकांचा गौरव सोहळा माजीमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. येथील कॉक्सिटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजीमंत्री संजय बनसोडे, संस्थचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील,संस्थेचे नागोराव पाटील, जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जळकोटचे नगराध्यक्ष मन्मथप्पा किडे, विशेष कर्तव्य अधिकारी डॉ. ई. यू. मासूमदार, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, प्रा. जितेंद्र बनसोडे उपस्थित होते. आ. बनसोडे म्हणाले,ग्रामीण विद्यार्थ्यांनी बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये मिळविलेले स्थान हे कौतुकास्पद आहे. त्यांनी या संधीचे सोने करून देशाच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे सांगून कॉक्सिटने मागील अनेक वर्षांपासून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात संगणकशास्त्राच्या रुपाने ज्ञानाचा दिवा लावण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच एकाच वर्षात तब्बल १२६ विद्यार्थ्यांना नामांकित आयटी कंपन्यांमध्ये मोठ्या पॅकेतजच्या नोकर्या मिळाल्या आहेत. डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात सर्व प्राध्यापकांनी घेतलेल्या परिश्रमाचे हे चीज आहे, असे ते म्हणाले. अध्यक्षीय समरोपात डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी सलग तीन वर्षे महाविद्यालयाच्यावतीने तयारी करून घेण्यात आली. कंपन्यांना हवे असलेलाच अभ्यासक्रम कॉक्सिटमध्ये शिकविला जातो. त्याचेच फलित म्हणजे म्हणून १२६ विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे फळ आहे, विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट जगतात संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी यांनी कॉक्सिटने घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे एकाचवेळी १२६ विद्यार्थ्यांना नोकर्या मिळाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले. अद्यापही विप्रो या कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत निवड झालेल्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांच्या निवडी जाहीर होणार असल्याचे महाविद्यालयाच्यावतीने सांगण्यात आले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# उमरग्यात पेरणीपूर्व मशागत सुरु:खरीप हंगामाचे ७५,४१६ हेक्टर सरासरी क्षेत्र; यंदा चांगल्या पावसाची शेतकऱ्यांना आशा



**उमरगा/प्रतिनिधी :** तालुक्यामध्य सर्वाधिक क्षेत्र हे खरीप हंगामाचे असून त्यात कोरडवाहू क्षेत्र अधिक आहे. सद्या हवामान खात्याचे दिलासादायक अंदाजानुसार शेतकरीराजा आता खरीप पेरणीपुर्व मशागतीचे काम करण्यात व्यस्त झाला आहे तर काहीना शिल्लक तुरीच्या विक्रीची चिंता लागली आहे.गतवर्षीच्या हंगामात तुरीसह सोयाबीन, हरभरा पिकांचे उत्पन्न निघाल्याने शेतकरी समाधानी होता, परंतु हमीभाव केंद्रावर अनेक अडचणी निर्माण झाल्याने अद्यापहि घरी पडून आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा चांगल्या पावसाची अपेक्षा व्यक्त केली जात असलीतरी पावसाळ्यापूर्वी शेतीतील कामे पूर्ण करून रान पेरणीसाठी तयार ठेवण्याच्या कामात शेतकरी गुंतला असल्याचे शेत शिवारात सुरू असलेल्या लगबगीवरुन दिसून येत आहे. गेल्या दोन वर्षा पासून आर्थिक विवंचनेत असलेल्या शेतकरी घरातील किडुक-मिडुक विकून तर काहीनी उसनवारीने काळ्या आईची ओटी भरण्याची तयारी सुरू केली आहे. सद्या शेतीतील ज्वारीचे तुरीचे दसकटे काढणे, शेणखत टाकणे, औत मारणे, नांगरणी आदीसह कामे सुरू आहेत. बहुतांश शेतकरी ट्रक्टरने मशागतीचे कामे करण्यात येत आहेत.

बी-बियाणे व खत विक्रेते शेतकऱ्यांच्या प्रतीक्षेत... हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा मान्सुन जून महिन्यात येण्याची शक्यता नसली तरी ही पाऊस येण्याचे गृहीत धरून तालुक्यातील बि-बियाणे व खत विक्रेत्यांनी विविध कंपनीचे खते व बियाण्याचा साठा करण्यास सुरुवात केली आहे तर कृषी विभाग त्यासाठी सज्ज झालेले असून बियाणे,खत विक्रेत्यांना आता पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

वर्षातुन दोन हंगाम रब्बी,खरीप आमच्यासाठी महत्वाचे असून खरीपाच्या पेरणीचा मोसम सुरु होणार असल्याने आर्थिक चणचण असताना ही उसनवारी करून मशागतीचे कामे ऊरकून काळ्या आईची ओटी भरण्याची तयारी करावी लागत आहे. गेल्या दोन वर्षापासून सततच्या व अतिवृष्टीने मुबलक उत्पन्नाची आशा मातीमोल ठरते आहे. गतवर्षी काढलेले पैसे देणे देण्यातच गेले, पुन्हां उसनवारी करण्याची वेळ आली असलीतरी पेरणीपुर्व मशागतीचे कामे केल्यास चांगले उत्पन्न होणार आहे.

# जावयाची हौस सासऱ्याने पुरवली! धोंडे जेवणाला दिली चक्क घोडी



**धाराशिव/प्रतिनिधी:** राज्यभरात अधिक मासचा म्हणजेच धोंड्याचा महिन्याचा उत्साह आहे. धोंड्याच्या महिन्यात जावयाला सासरवाडीकडून विशेष मानपान मिळतो. सासरच्या मंडळींकडून जावयाला भोजनाचं निमंत्रण दिलं जातं. यासोबतच जावयाचं औक्षण केलं जातं. यावेळी जावयाला सासरच्या मंडळींकडून स्पेशल भेटवस्तू दिली जाते. जावयाला आयुष्यभर लक्षात राहील अशी भेटवस्तू देण्याचा प्रयत्न सासऱ्याचा असतो. अर्थात जो तो आपापल्या ऐपतीनुसार भेटवस्तू देत असतो. पण राज्यभरात अधिक मासच्या महिन्यात जावयाचा सन्मान केला जातो. जावयाला धोंडा दिला जातो. हे सर्व सांगण्यामागचं कारण म्हणजे धाराशिवमध्ये एका जावयाला सासरच्या मंडळींकडून मिळालेलं विशेष गिफ्ट.

धाराशिवमध्ये अधिक मासनिमित्त सासऱ्याकडून जावयाला अनोखी भेट देण्यात आली आहे. या भेटीची पंचक्रोशीत जोरदार चर्चा रंगली आहे. महागाई आणि पेट्रोल दरवाढीच्या काळात जावयाला तब्बल सिंधी जातीची घोडी भेट देण्यात आली आहे. पारंपरिक धोंडे जेवणाच्या कार्यक्रमात ही आगळीवेगळी भेट देण्यात आल्याने उपस्थितांनी आश्चर्य व्यक्त केले. पेट्रोलपेक्षा घोडीच परवडली, अशा प्रतिक्रिया देखील नागरिकांमधून उमटत आहेत.

या अनोख्या भेटीमुळे परिसरात उत्सुकता निर्माण झाली आहे. सासऱ्याकडून मिळालेली ही भेट पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

ईट येथील वकील क्रांतीसिंह राऊत यांचा विवाह कोरोनापूर्वी पारा येथील विलासराव झांबरे यांच्या मुलीशी झाला होता. आणि ऐन कोरोना काळात अधिक मास आला होता. या काळात सासऱ्याने जावयाची हौस केली नव्हती. कारण होते कोरोनाचा संकट काळ.

सध्या अधिक मास सुरू आहे. या महिन्यामध्ये जावयाला सासरी बोलावून पाहुणचार केला जातो आणि नंतर सोने स्वरूपात किंवा इतर वस्तू स्वरूपात त्यांना भेट दिली जाते. क्रांतिसिंह राऊत यांना देखील पारा येथील सासरवाडीत अधिकमासाचे जेवणाचे निमंत्रण दिले होते. सासरे विलासराव झांबरे यांना माहिती होते की जावई क्रांतीसिंह यांना घोडा आवडतो. नेमका हाच धागा पकडून सासरे विलासराव झांबरे यांनी केज तालुक्यातील साळेगाव येथील सलमान खान यांच्या माध्यमातून सिंधी जातीची घोडी आणली.जावई क्रांतीसिंह राऊत यांना धोंडे जेवण खाऊ घातल्यानंतर ही सिंधी जातीची घोडी त्यांना भेट स्वरूपात देण्यात आली. या घोडीची किंमत काहीही असली तरी हौसेला मोल नसते, सासऱ्याने जावयाची हौस पूर्ण केली आहे. जावई क्रांतीसिंह राऊत या घोडीवर बसून शेतात जातात. त्यांची दोन वेगवेगळ्या ठिकाणी शेती असल्या कारणामुळे या घोडीचा उपयोग आता त्यांना शेतात जाण्यासाठी होतो.

वाढलेले पेट्रोल, डिझेल, गॅस याचे दर गगनाला भिडले आहेत. पण घोडीला पेट्रोल, डिझेल, गॅस लागत नसल्यामुळे वकील क्रांतिसिंह राऊत यांना याचा खर्च सध्यातरी बसत नाही. घोडीला लागतो तो केवळ चारा. क्रांतिसिंह राऊत यांच्या या घोडीची चर्चा धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र होताना पाहायला मिळत आहे.

# तलवार जप्त करून गुन्हा नोंदविला

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फैय्यज, आयाज रा. मोमीन गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२८.०५.२०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती गेअवर रोडवर परंडा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक चाकु हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलींसाना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करून फिर्यादी नामे-सुर्यजीत जगदाळे पोलीस उप निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम-कलम ४९ भा.न्या. सं. सह ४,२५ सह ११०, १२२, ११७,१३५ महा पोलीस अधिनियम अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आह

# येरमाळ्यात भेसळयुक्त खव्याचे अड्डे:अन्न व औषध प्रशासनाच्या छाप्यात २१५ किलो खवा जप्त

**येरमाळा/प्रतिनिधी :** येरमाळा खव्याची बाजारपेठ म्हणून सरमकुंडी, येरमाळा, चौसाळ्यासह नांदूरघाट आदी ठिकाणे प्रसिद्ध आहेत. या भागातून राज्यातच काय राज्याबाहेरही खवा विक्री केला जातो. गुणवत्तापूर्ण खव्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या भगात मागील काही वर्षांपासून भेसळयुक्त खव्याची विक्री होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यात रोज तब्बल ३ ते ४ हजार किलो भेसळयुक्त खवा राजरोसपणे विकला जात आहे.

येरमाळा ही राज्याची मुख्य बाजारपेठ मराठवाड्यातील येरमाळा, सरमकुंडी फाटा, नांदूरघाट, धारूर, चौसाळा, भूम आणि केज येथे दुधापासून नैसर्गिक पद्धतीने तयार केलेला खवा औरंगाबाद, धुळे, जळगाव, परभणी, हिंगोली, नांदेड, कोल्हापूर, पंढरपूर, सोलापूर, लातूर, पुणे, मुंबई, बारामती, अहमदनगर, नाशिक, शिर्डीसह परराज्यात विक्री केला जातो.

सांगलीहून येणारा बनावट खवा अवघ्या ७० रुपये प्रति किलो दराने मिळतो. हाच ७० रुपयांचा निकृष्ट खवा शुद्ध खव्यात मिसळून, त्याचे आकर्षक पॅकिंग करून शहरांमधील नागरिकांना चांगल्या खव्याच्या नावाने चढ्या दराने विकला जात आहे. या बनावट खव्यामुळे ग्राहकांनी आता



अत्यंत जागृत राहण्याची गरज आहे.

मराठवाड्यातील खव्याला पूर्वी गुणवत्तेच्या बाबतीत मोठी प्रतिष्ठा होती. आजही काही व्यापारी नियमानुसार चांगल्या दर्जाच्या खव्याचीच विक्री करतात. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून येरमाळा, भूम, सरमकुंडी, केज येथील काही व्यावसायिकांनी सांगलीहून येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या दूध पावडरच्या खव्याची भेसळ सुरू केली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार धाराशिव जिल्ह्यात भेसळीविरोधात विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. येरमाळा असेल किंवा इतरही ठिकाणी वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येत असून, नागरिकांनी भेसळयुक्त पदार्थ असेल तर कार्यालयाशी संपर्क साधावा. -आर. डी. फंदी, अन्न सुरक्षा अधिकारी, धाराशिव अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार सध्या धाराशिव जिल्ह्यात अन्नपदार्थांमधील भेसळीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी रोहित फंदी यांच्या पथकाने २७ मे रोजी येरमाळा येथील 'सायली खवा ट्रेडिंग कंपनी'वर अचानक छापा टाकला. या कारवाईत विक्री व वाहतुकीसाठी साठवून ठेवलेला अंदाजे ४७ हजार ३०० रुपये किमतीचा २१५ किलो भेसळयुक्त खवा जप्त करण्यात आला आहे.

या जप्त केलेल्या खव्याचे नमुने तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले असून, त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर 'अन्न सुरक्षा व मानदे कायद्या'नुसार कठोर फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. ही धडक कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी आर. डी. फंदी, नमुना सहाय्यक आर. यू. शेंडगे यांच्या पथकाने सहाय्यक आयुक्त पी. एस. काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली केली. या अचानक झालेल्या धाडीमुळे जिल्ह्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांमध्ये आणि खवा माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# माकणीतील शिबिरात २११ जणांची मोफत आरोग्य तपासणी

**माकणी/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील जनतेला तज्ज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या



उद्देशाने, तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर (नेरूळ, नवी मुंबई) व ज्ञानज्योती फाउंडेशन (उमरगा) यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठल रुक्माई मंदिर माकणी येथे मंगळवारी (दि. २६) मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून २११ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व समुपदेशन करण्यात आले.

शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात अद्ययावत वैद्यकीय सेवा पोहोचवणे ही काळाची गरज बनली आहे. नेमका हाच धागा पकडून मुंबईच्या प्रसिद्ध तेरणा हॉस्पिटलने व ज्ञानज्योती फाउंडेशनने तालुक्यातील माकणी येथे या विशेष शिबिराचे आयोजन केले होते. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांनी थेट ग्रामीण भागात येऊन रुग्णांची तपासणी केल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. या शिबिरात हृदयविकार, मधुमेह, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग आणि सर्वसाधारण आजारांची मोफत तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर साठे, भाजपा तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी लोहारा पंचायत समितीच्या सभापती पल्लवी जानकर, उमरगा पं. स. सभापती ड. आकांक्षा चौगुले, सास्तूरच्या सरपंच शीतल पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस अनिल ओवांडकर, ग्रा.प. सदस्य निकेत पत्रिके, अण्णासाहेब साठे, शुभम साठे, राजवर्धन पाटील, ड. दादासाहेब जानकर, जिल्हा संयोजक दिलीप पवार, शुभम पाटील, दौलत पाटील तसेच ज्ञानज्योती फाउंडेशनचे कोषाध्यक्ष अमर देशाटवार आदी मान्यवर उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी अमित सय्यद व श्रीहरी गरड यांनी शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले.

७७ रुग्णांना पुढील उपचारासाठी पाठवणार शिबिराच्या माध्यमातून २११ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यामधील ७७ रुग्णांना पुढील गंभीर व अद्ययावत उपचारांची आवश्यकता असल्याने, त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे. या सर्व ७७ रुग्णांना पुढील उपचारासाठी नेरूळ, नवी मुंबई येथील तेरणा हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यात येणार असून, त्यांच्यावर तेथे पुढील उपचार केले जातील. शिबिरात रुग्णांची तपासणी करण्यासाठी तेरणा हॉस्पिटलच्या नामांकित डॉक्टरांचे पथक उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या न्यायासाठी रणशिंग; संजय मुंदडा यांची विधान परिषदेसाठी दमदार एन्ट्री

धाराशिव(रामेश्वर डोंगरे)- स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत आता रंगत वाढू लागली असून अनुभवी नगरसेवक आणि माजी नगराध्यक्ष संजय पांडुरंगजी मुंदडा यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवली आहे. कळंब नगर परिषदेमधील दहा नगरसेवकांच्या स्वाक्षरीने समर्थित ही उमेदवारी आता चर्चे चा विषय ठरत आहे. महाविकास आघाडीचे खासदार जारिज्ञरीह ठरक्षश छळालरश्रज्ञरी तसेच आमदार घरळश्रशी झरींळश्र यांच्याकडे अधिकृत उमेदवारीची मागणी करण्यात आल्याचे मुंदडा यांनी स्पष्ट केले.

**स्थानिक स्वराज्य संस्था दुर्लक्षित; म्हणूनच मैदानात उतरलो**

संजय मुंदडा यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अनेक वर्षांपासून या मतदारसंघातून निवडून गेलेल्या प्रतिनिधींनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. नगरपालिकांमधील अधिकार मर्यादित होत चालले असून अध्यक्ष, मुख्याधिकारी आणि प्रशासन यांच्यातील विस्कळीत व्यवस्थेमुळे जनतेची कामे रखडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**२० वर्षांचा राजकीय अनुभव**

संजय मुंदडा यांना नगरसेवक, सभापती, गटनेता, उपनगराध्यक्ष आणि नगराध्यक्ष असा तब्बल २० वर्षांचा अनुभव आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सखोल अभ्यास आणि प्रशासनाचा अनुभव यामुळे त्यांची उमेदवारी आता अधिक गंभीर मानली जात आहे.

नामनिर्देशन पत्रावर सौ. अर्चना प्रताप मोरे, सौ. आशा सुधीर भवर, सौ. इंदुमती जयनंदन हौसलमल, सौ. ज्योती दिपक हारकर, सौ. वनमाला शंकर वाघमारे, सौ. सफूरा शकील काझी, सौ. रुखसाना चाँदसाब बागवान, सागर सुभाष मुंडे, मोसीन सलीम मिर्झा आणि जमील महम्मद कासीम खाटीक यांच्या सह्या आहेत.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649